लोकमत

# मुंडगाव येथे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंडगाव :** येथील राधाबाई गणगणे कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे सुमित सपकाळ, अनिकेत भुडके यांनी सायबर क्राईम, ऑनलाइन खरेदी या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन खरेदी, मोबाइलमध्ये येणारे नवनवीन ॲप्स, फसव्या लिंक यापासून कसे दूर राहता येईल, याबाबत सविस्तर माहिती देऊन ऑनलाइन फसवणुकीपासून कसा बचाव करण्यात येईल, याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

याप्रसंगी मुख्याध्यापक चंद्रशेखर अंबळकार, पर्यवेक्षक बाळासाहेब काटे, अनिल म. गवई, माणिक मो. राठोड, देवेंद्र सोनटक्के, राजेंद्र मुर्हेकार, डिगांबर घुगे, आनंद चंदनकार, नीलेश देशमुख, हेमंत गणगणे, बिपीन नावकर, मिलिंद शेलकर, सुदर्शा पाटकर, गीता वलवले, सुवर्णा येवतकार, स्वाती मडघे, अनिता कोडापे उपस्थित होते.